स्वच्छ भारत
एक पाऊल स्वच्छतेकडे

स्वच्छ महाराष्ट्र अभियान
सप्तपदी स्वच्छतेची

HARIT
MAHA City Compost

सत्यमेव जयते

# स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)

## माहिती, शिक्षण संवाद (IEC) आणि वर्तणुकीतील बदल (BCC)

## मार्गदर्शिका



# अनुक्रमणिका


| अ.क्र. | | पान |
|---|---|---|
| १. | कार्यवाही सारांश | १ |
| २. | संकल्पना स्पष्टीकरण | २ |
| ३. | उपक्रम | ३ |
| | १. आकर्षक स्वरूपात भिंती रंगविणे | ३ |
| | २. घर ते घर जनजागृती अभियान राबवून स्वच्छते संबंधी माहिती देणारे स्टिकर्स चिटकविणे | ५ |
| | ३. शालेय स्पर्धांचे आयोजन | ६ |
| | ४. समाजमाध्यमांवर उत्तम दर्जाचे प्रबोधनात्मक साहित्य प्रकाशित करणे. | ७ |
| | ५. मोठ्या स्वरूपातील कार्यक्रम | ८ |
| | ६. छापील साहित्य वाटप | ९ |
| | ७. स्वच्छतादूत नियुक्ती | १० |
| | ८. स्वच्छता स्पर्धा | ११ |
| | ९. माहिती व तंत्रज्ञानाचा वापर करून सामुदायिक व सार्वजनिक शौचालयांची देखरेख | ११ |
| | १०. त्रैमासिक बैठका | १३ |
| | ११. होर्डींग्ज/बॅनर्स | १४ |
| | १२. प्लॅस्टिक बंदीसाठी समन्वय बैठका | १४ |
| | १३. स्वयंसहाय्यता गटांचे स्वच्छता अभियानात समावेशन | १५ |
| | १४. इतर | १६ |
| ४. | आर्थिक शिस्त | १७ |
| ५. | परिशिष्ट १ | १७ |
| ६. | परिशिष्ट २ | १९ |

# कार्यवाही सारांश

स्वच्छ भारत अभियानातंर्गत आतापर्यंत आपण अनेक स्तृत्य उपक्रम राबविले आहेत. परंतु, यापुढेही हे उपक्रम नित्य राबविणे, त्यांची परिणामकारकता दीर्घ काळासाठी टिकवून ठेवणे, हेदेखील तितकेच आवश्यक आहे. स्वच्छ महाराष्ट्र अभियान राबवत असतना त्यात जनसहभागाचे विशेष महत्व आहे. एकूणच समाजाची मानसिकता व वर्तनातील बदलाने स्वच्छतेचे अपेक्षित लक्ष्य साध्य करणे शक्य होईल. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार माहिती, शिक्षण, संवाद (IEC) आणि वर्तनातील बदल (BCC) संबंधी उपक्रम राबवत असताना रचनात्मक आणि दीर्घकालीन स्वरूपात प्रभावी ठरतील, असे उपक्रम राबविणे आवश्यक आहे. दूरचित्रवाणी व आकाशवाणी यांवर जनजागृतीचे कार्यक्रम प्रसारित करण्याचे काम केंद्र शासनातर्फे होत असल्या कारणाने त्याव्यतिरिक्त काही उपक्रमांवर आपणांस मिळणारा निधी खर्च करणे अपेक्षित आहे.

या पुस्तिकेचा हेतू, स्वच्छ महाराष्ट्र अभियान संबंधी माहिती, शिक्षण, संवाद आणि वर्तनातील बदल याविषयीच्या संकल्पना स्पष्ट करणे व त्या अनुषंगाने राबविण्यास आवश्यक असलेल्या उपक्रमांविषयी माहिती देणे हा आहे. आपल्या शहराच्या स्तरावर समाजाच्या व्यापक सहभागातून सदर उपक्रम राबविल्याने स्वच्छ सर्वेक्षण २०१९ च्या दिशेने तसेच, एकूणच स्वच्छतेच्या या अभियानात आपल्या शहरास आघाडी घेता येईल.


माहिती, शिक्षण, संवाद आणि वर्तनातील बदल या संकल्पना समजून घेतल्यानंतर त्याची माहिती लोकांना देणे, स्वच्छतेविषयी व्यापक स्तरावर जनजागृती करणे, यामुळे केवळ स्वच्छता अभियानासच  हातभार लागणार नसून, त्या माध्यामातून शहरातील राहणीमानाचा स्तर उंचावून तेथील रहिवासही अधिक सुखकारक होईल. पर्यटन, आरोग्य आदी विविध क्षेत्रांनाही स्वच्छतेच्या या मोहीमेने चालना मिळेल. सदर कार्यप्रणाली अंमलात आणत असताना पारंपरीक माध्यमे व कार्यपद्धती यांच्या सोबतच आजच्या पिढीला अतिशय जवळची असणारी समाजमाध्यमे यांचा वापर व इतरही नावीन्यपूर्ण व अभिनव उपक्रम राबविल्यास त्याची परिणामकारकता निश्चितच वाढेल.

# संकल्पना स्पष्टीकरण

**माहिती, शिक्षण, संवाद आणि वर्तनातील बदल म्हणजे नक्की काय?**

स्वच्छता अभियानाच्या संदर्भात या संकल्पनेचे अगदी सोप्या व थोडक्या शब्दात वर्णन करायचे तर ते स्वच्छतेसंबंधी लोकशिक्षण व जनजागृती, अर्थात IEC, असे करता येईल. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या पातळीवर घर ते घर कचरा संकलनासाठी फिरविण्यात येणाऱ्या घंटागाड्या, व्यापारी परिसरात दिवसातून दोन वेळा केली जाणारी स्वच्छता व साफसफाई, जमा झालेल्या कचऱ्यावर शास्त्रशुध्द पद्धतीने प्रक्रिया करण्याचे प्रयत्न, हागणदारीमुक्ततेसाठी सार्वजनिक/सामुदायिक/वैयक्तिक शौचालायांवर निधी खर्च करणे, आदी कामे केली जात असताना त्यास जनतेचा पाठींबा व सहकार्य न मिळाल्यास सदर स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फत केले जाणारे प्रयत्न व्यर्थ ठरू शकतात.

त्यामुळे, कचरा संकलन करते वेळीच तो ओला व सुका विलगीकृत स्वरूपात गोळा करुन घंटा गाडीवर जमा करणे. उघड्यावर शौचास न जाणे, सार्वजनिक/सामुदायिक/वैयक्तिक शौचालायाचा वापर करताना स्वच्छतेच्या सवयी अंगवळणी आणणे, आदी स्वच्छतेसंबंधी लोकांच्या सवयी सुधारणे म्हणजेच वर्तनातील बदल होय. त्यासाठी आवश्यक जनजागृतीचे उपक्रम राबविणे, संदेश देणाऱ्या भिंती रंगविणे, शाळेतील मुलांचे प्रबोधनपर कार्यक्रम घेणे, स्पर्धा भरविणे, स्वच्छतेच्या सवयींची माहिती देणारी भित्तीचित्रे चिटकवीणे,इत्यादी, माहिती, शिक्षण, संवादाची काही उदाहरणे देता येतील.



# उपक्रम

'लोकशिक्षण आणि जनजागृती' हा विषय हाताळण्यासाठी आपल्याला सहाय्यक होतील, असे काही उपक्रम खाली नमूद केले असून, ते उपक्रम आपण आपल्या स्थानिक स्वराज्य संस्था हद्दीत राबवावेत. त्याचबरोबर नमूद उपक्रमांसारखे इतर नाविन्यपूर्ण उपक्रमही आपणास राबविता येतील.

### १) आकर्षक स्वरूपात भिंती रंगविणे :

दृश्य माध्यमांतून दिलेला संदेश हा सहज समजून घेता येतो व एकदा रंगविलेले भिंतीवरील चित्र नागरिकांच्या नजरेसमोर दीर्घ काळासाठी टिकून राहते. तसेच, बॅनर/होर्डिंग पेक्षा भिंतीवरील संदेश अधिक काळासाठी टिकून राहतात व पर्यावरणासही हानी पोहोचत नाही.






**भिंती रंगवून घेत असताना खालील काही मुद्द्यांकडे लक्ष द्यावे:**

- सदर भिंत वर्दळीच्या परंतु, गर्दीतून दिसेल अश्या ठिकाणी निवडावी.
- सदर भिंत स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मालकीची असल्यास उत्तम. नसल्यास, मालमत्ता धारकाकडून भिंत रंगविण्याबाबतचे ना–हरकत प्रमाणपत्र घ्यावे.
- भिंतीवरील संदेश, मोजक्या शब्दांत, लोकांना आशय पटकन समजेल असा असावा.
- भिंतीवर संदेश रंगविताना त्यात चित्रांचा समावेश करावा, जेणेकरून चित्र आकर्षक बनेल.
- सदर भित्तीचित्र आपल्या शहराशी निगडीत वास्तू, नदी, ऐतिहासिक स्थळे, प्रसिध्द धार्मिक/पर्यटन स्थळे यांचेशी संबंधित असल्यास अधिक परिणामकारक ठरतील.



**२) घर ते घर जनजागृती अभियान राबवून स्वच्छते संबंधी माहिती देणारे स्टिकर्स चिटकविणे :**

शहर स्वच्छ करण्यात घनकचरा व्यवस्थापन हा सर्वात कळीचा मुद्दा आहे. नागरिकांनी ओला व सुका कचरा वेगवेगळा करूनच घंटागाडीत जमा करणे, कचरा कुठेही उघड्यावर न टाकणे, कच–याची मुळातच अनावश्यक निर्मिती होवू न देणे, प्लास्टिक चा वापर बंद करणे, यासाठी नागरिकांचे प्रबोधन करून त्यांचेकडून या सर्व गोष्टी करवून घेणे आवश्यक ठरते. त्यासाठी या जनजागृती मोहिमेचा लाभ होईल. या मोहिमेदरम्यान अनेक घरांना भेटी देत असताना त्यांना या सर्व उद्देशांचा संदेश देणारे माहितीपत्रक वाटणे, किंवा त्यांच्या परवानगीने हि माहिती देणारे छोटे पोस्टर्स/स्टिकर्स चिटकविणे, याचादेखील फायदा होवू शकतो.









**३) शालेय स्पर्धांचे आयोजन :**

शालेय विद्यार्थी हे स्वच्छतेच्या परिवर्तानातील सर्वांत महत्वाचा दुवा आहेत. या विद्यार्थ्यांच्या माध्यमातून त्यांचे पालक व कुटुंबियांचेही प्रबोधन आपसूकच होते. आपल्या शहरातील शाळांमध्ये विविध स्पर्धा, जसे कि, चित्रकला स्पर्धा, निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, यांचे स्वच्छतेच्या संदर्भातील विषयांवर आयोजन करून त्यातील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षिसांचे वाटप करून त्यांना प्रोत्साहन द्यावे.



**४) समाजमाध्यमांवर उत्तम दर्जाचे प्रबोधनात्मक साहित्य प्रकाशित करणे :**

तंत्रज्ञांनाच्या आजच्या युगात समाजमाध्यमे हे अधिकाधिक लोकांपर्यंत विनाखर्च वा अत्यल्प खर्चात कमी वेळात पोहोचण्याचे प्रभावी माध्यम आहे. यात आपण फेसबुक, ट्वीटर सारख्या ओपन प्लॅटफॉर्म असलेल्या माध्यमांचा आपल्या कार्यालयात उपलब्ध यंत्रणेद्वारे विनाखर्च वापर करू शकतो. तसेच बल्क एसएमएस सारख्या यंत्रणेचाही वापर करता येऊ शकतो.यासाठी खालील मुद्द्यांचा समावेश करावा:

- फेसबुकवर नगरपरिषदचे/महानगरपालिकेचे अधिकृत पेज व ट्वीटरवर अधिकृत अकाउंट तयार करावे.
- सर्व कर्मचारी वृन्दांच्या माध्यमातून या पेज/अकाऊंट्सचे फॉलोअर्स वाढवावे.
- सदर अकाउंट वर प्रबोधनपर साहित्य पोस्ट करावे, स्वच्छता संबंधी उपक्रम, स्पर्धांची माहिती द्यावी.
- या पेजवर आपल्या स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फत राबविल्या जाणाऱ्या उपक्रमांची माहिती द्यावी.
- काही महत्वपूर्ण संदेश देण्यासाठी टेलिकॉम कंपनीमार्फत उपलब्ध होणाऱ्या बल्क एसएमएस सुविधेचाही आपण उपयोग करू शकतो.



### (५) मोठ्या स्वरूपातील कार्यक्रम :

स्वच्छता फेरी, कीर्तन/प्रवचने, आदी, यांचादेखील समाजमनावर प्रभाव पडत असतो. वर्षातून दोन वेळा अशा मोठ्या कार्यक्रमांचे आयोजन सुनियोजित पद्धतीने करावे. या कार्यक्रमांत समाजातील अधिकाधिक घटकांचा समावेश व्हावा, यासाठी प्रयत्न करावा.शाळेच्या विद्यार्थ्यांची स्वच्छता प्रभात फेरी काढता येईल. त्यात पालकांचाही समावेश करून घेवू शकतो.

सर्व शाळा, विविध सार्वजनिक कार्यक्रम घेणारी मंडळे, संस्था, महाविद्यालये, एनएसएस मधील सहभागी विद्यार्थी यांच्या एकत्रीकरणातून मॅरेथॉन सारख्या मोठ्या कार्यक्रमाचे आयोजन करता येईल. मंदिर, मशिदी, चर्च, आदी सर्व धार्मिक स्थळे, येथे होणाऱ्या कीर्तन, प्रवचन यांसारख्या कार्यक्रमांतून स्वच्छता संदेश देण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या संयुक्त विद्यमाने अशा कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येईल.

या कार्यक्रमांची माहिती लोकांपर्यंत पोहोचावी यासाठी समाजमाध्यमे, बल्क एसएमएस, होर्डींग्स यांचे माध्यमातून प्रसिद्धी करता येईल.






### ६) छापील साहित्याचे वाटप :

जनजागृतीसाठी वातावरणनिर्मिती हा महत्वाचा घटक ठरतो. त्यासाठी आपणास काही अभिनव असे छापील साहित्याचे वाटप करता येऊ शकते, जसे कि, छापील टी–शर्ट्स, छापील चहाचे कप, छापील वह्या, पेन, इत्यादी. हे छापील साहित्य वाटप करण्यासाठी आपण लोकवर्गणीतून अथवा देणगीच्या माध्यमातून मागणीप्रमाणे साहित्य बनवून घेवून वाटप केल्यास ते चांगले उदाहरण ठरू शकते व त्याने पालिका प्रशासनावरील अतिरिक्त खर्चाचा भारही वाचू शकतो. निकडीच्या प्रसंगी या साहित्यावर आपल्या स्थानिक स्वराज्य संस्थेस जनजागृती साठी प्राप्त निधीतील काही भाग खर्च करण्यास हरकत नाही.





**७) स्वच्छतादूत नियुक्त करणे:**

शहरातील काही अराजकीय, सन्माननीय, कर्तृत्ववान, सुप्रसिध्द व्यक्तींचाही समाजमनावर प्रभाव असतो. राज्य/केंद्र, नगररिषद/महानगरपालिका वा शासनाच्या सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी/कर्मचारी,शहरातील वकिल,डॉक्टर,पत्रकार ज्यांना मानापासून स्वच्छतेची आवड असेल अशा व्यक्तींची आपण स्वच्छतादूतपदी नियुक्ती करून त्यांच्या माध्यामातून आणि/अथवा त्यांच्यासहित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रमांचे आयोजन केल्यास त्याचा प्रभाव समाजावर पडून त्यांच्या वर्तनात बदल घडून येण्यास नक्कीच मदत होईल. ही नियुक्ती करताना खालील मुद्द्यांकडे लक्ष द्यावे:

- सदर व्यक्तीची समाजातील प्रतिमा वादग्रस्त असू नये.
- एका विशिष्ट राजकीय विचारधारेशी त्या व्यक्तीची प्रतिमा जोडलेली नसावी.
- सदर व्यक्ती विनामोबदला आपल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या माध्यमातून हे काम करण्यास तयार असावी व त्या व्यक्तीची या कामास महिन्यातून एकदा वेळ देण्याची तयारी असावी.
- नियुक्त केल्या जाण्याऱ्या शहरातील एकूण स्वच्छतादूतांची संख्या किमान एक व कमाल संख्या शहरातील एकूण निवडणूक प्रभागांपेक्षा अधिक नसावी.
- सदर नियुक्ती हि एक वर्षाच्या कालावधी साठी असावी.
- स्वछतादूतांच्या माध्यमातून महिन्यातून किमान एक कार्यक्रम घेण्यात यावा व त्या संदर्भातील बातम्यांची कात्रणे, फोटो, कार्यक्रमाचे इतिवृत्त यांची नोंद ठेवावी. तसेच त्याचे प्रकाशन आपल्या फेसबुक पेज वर करावे.

**८) स्वच्छता स्पर्धा :**

स्वच्छ सर्वेक्षण मध्ये जवळपास सर्वच शहरांमध्ये स्वच्छता स्पर्धा राबविण्यात आल्या. शहरातील शाळा, हॉटेल्स, गृहनिर्माण संस्था, नोंदणीकृत बाजारपेठा, स्वच्छ वार्ड, रुग्णालये यांच्यात स्वच्छतेची स्पर्धा घेवून त्यांच्यातील सर्वात स्वच्छ प्रत्येकी तीन सर्वोत्तम क्रमांक निवडून त्यांचा बक्षिसे दयावी जेणेकरून सर्वांनाच पुढील स्पर्धेत चांगली कामगिरी करण्यासाठी प्रोत्साहन मिळेल.

- स्वच्छता स्पर्धेची कार्यवाही करताना सर्वेक्षण करण्यासाठी पारदर्शक पद्धतीचा अवलंब करावा.
- सदर स्पर्धा वर्षातून दोनदा घेण्यात यावी.
- स्पर्धा सुरु होण्यापूर्वी किमान एक आठवडा स्पर्धेतील स्वच्छतेची मानांके जाहीर करावी व सर्व शाळा, हॉटेल्स, रुग्णालये, गृहनिर्माण संस्था, नोंदणीकृत बाजारपेठ, यांचे प्रमुख/ व्यवस्थापक/ पदाधिकारी यांची बैठक बोलवून, त्यात हि माहिती सर्वांना देण्यात यावी.
- जाहीर कार्यक्रमात निकाल घोषित करून बक्षिसांचे वितरण करण्यात यावे.

**९) माहिती व तंत्रज्ञानाचा वापर करून सामुदायिक व सार्वजनिक शौचालयांची देखरेख:**

सामुदायिक व सार्वजनिक शौचालायांच्या बांधकामानंतर त्यांचा दर्जा राखणे, देखभाल करणे, हे एक मोठे आव्हानच असते. त्यामुळे त्यांच्या देखरेख व दर्जाचे नियंत्रण करण्यासाठी माहिती व तंत्रज्ञानाचा अर्थात IT चा वापर करावा.



हे काम करत असताना खालील मुद्दे गृहीत धरावे. :

* सर्व सार्वजनिक व सामुदायिक शौचालये हि गुगल मॅपमध्ये निर्देशित केलेली असावीत
* सदर शौचालायांबाहेर स्वच्छता सवयी अंगवळणी आणण्यासाठी संदेश देणारी भित्तीचित्रे / पोस्टर्स लावलेली असावीत
* सदर शौचालया बाहेर भिंतीवर प्रतिक्रिया देता येण्यासाठी संपर्क प्रणाली, उदा. फीडबॅक मॉनिटरिंग सिस्टीम बसविण्यात यावी व त्यावर येणाऱ्या प्रतिक्रियांचा दर आठवड्यास आढावा घेण्यात यावा.
* तसेच या शौचालयांमध्ये महिलांसाठी सॅनिटरी नॅपकिन व्हेंडिंग मशीन व त्यांची विल्हेवाट लावण्याची सुविधा उपलब्ध असल्यास, वापरण्याचे संदेश देणे.



## १०) त्रैमासिक बैठका

आपल्या शहरात विविध क्षेत्रातील व्यक्ती, संघटना जसे कि, धर्मगुरू, बचतगट, व्यापारी संघटना, गृहनिर्माण संस्था यांचा समाजाशी जवळचा संबंध असतो. मोठ्या प्रमाणावर लोक यांचेशी संलग्नित असतात. यां सर्वाना आपण स्वच्छता अभियानासंबंधी  त्रैमासिक बैठकांस आमंत्रित करून त्यांना आपल्या अभियानाची माहिती देवून आपल्या माध्यमातून जनजागृती करण्याची विनंती करता येऊ शकते. अशा बैठकांचा आपणास स्वच्छ सर्वेक्षण मध्ये चे वेळी उपयोग झालेला आहेच. तरी, या माध्यमातून जनजागृतीचे प्रयत्न पुढे नित्य कसे चालू ठेवता येतील यासाठी प्रयत्न करावा. तसेच, या बैठकांचे इतिवृत्त व इतर नोंदी ठेवल्यास आपणांस याचा भविष्यात लाभ होवू शकेल.



## ११) होर्डींग्ज/बॅनर्स :

आपण राबवत असलेल्या कार्यक्रमांची/उपक्रमांची माहिती जनतेपर्यंत पोहोचविण्याचे हे सर्वांत सोपे माध्यम आहे. या माध्यमातून एखाद्या विषयाबद्दल आवाहन करण्यासाठीदेखील आपल्याला या माध्यमाचा उपयोग करता येईल. परंतु, हे माध्यम भौतिकदृष्ट्या कमी टिकाऊ असल्याकारणाने ऊन, वारा, पाउस यांसारख्या नैसर्गिक आव्हानांमुळे लवकर खराब होते. त्यामुळे, याचा वापर शक्य तेवढा कमी व आवश्यक तेव्हाच करावा.




## १२) प्लॅस्टिक बंदीसाठी समन्वय बैठका :

राज्यात प्लॅस्टिक बंदी लागू झाली असून आपणास त्याची अंमलबजावणी करणे क्रमप्राप्त आहे. नवीन प्लास्टिक बंदी नियम २३ मार्च २०१८ मसुद्यातील सर्व नियम समजून घेतल्यानंतर त्यांची अंमलबजावणी करण्यापूर्वी शहरातील सर्व नोंदणीकृत व्यापारी संघटना, मेडिकल संघटना, आठवडे बाजारास येणारे शेतकरी यांची बैठक बोलावून, ही प्लॅस्टिकबंदी व्यापाऱ्यांना त्रास देण्यासाठी नसून, संपूर्ण शहराच्या स्वच्छतेच्या दृष्टीने अत्यावश्यक बाब असल्याचे समजावून सांगावे. तसेच, प्लॅस्टिकबंदीच्या कडक अंमलबजावणी व त्याचा आढावा घेण्यासाठी वर नमूद सर्व घटकांच्या नियमित त्रैमासिक बैठकांचे आयोजन करावे.

## १३) स्वयंसहाय्यता गटांचे स्वच्छता अभियानात समावेशन

गृह निर्माण आणि नागरी कार्य मंत्रालाय, भारत सरकार यांचे दीनदयाल योजना, राष्ट्रीय नागरी जीवनमान अभियान अर्थात 'DAY NULM', गरिबी आणि दारिद्र्य रेषेखालील नागरी कुटुंबांची भेद्यता यांचे निर्मुलन करण्याचे ध्येय ठेवते. हे अभियान गरिबांसाठी तळापासून संस्थात्मक रचना करते. त्यांना कौशाल्याधिष्ठीत रोजगार उपलब्ध करून देते, ज्याचा परिणाम त्यांचे जीवनमान उंचावण्यात होतो.

या मर्यादित गटांच्या आयुष्याचा दर्जा सुधरविण्यासाठी स्वच्छ भारत अभियान (नागरी) व 'DAY NULM' यांचे परस्पर समावेशान करण्याची आवश्यकता आहे. यासाठी संपूर्ण स्वच्छता मुल्यसाखळी, ज्यात कचऱ्याचे संकलन, वहन, प्रक्रिया, पुनर्वापर / विल्हेवाट यांचा समावेश होतो, त्यात या गटांच्या महिला सदस्यांना सामावून घेण्याची गरज आहे. तसेच स्वच्छता आणि कचरा व्यवस्थापन क्षेत्रासाठी रोजगार निर्मिती करणारी संस्थात्मक रचना आणि कौशल्य परिसंस्थाही निर्माण करावी लागेल.





## १४) इतर :

वर नमूद केलेले उपक्रम राबवत असताना काही निधी इतर उपक्रमांसाठी राखीव ठेवण्यात यावा. नगरपरिषद/महानगरपालिका यांचे सदस्य, अधिकारी, कर्मचारी, नागरिक यांच्या विचारमंथनातून काही कार्यक्रमांची संकल्पना पुढे येऊ शकते. ते कार्यक्रम आपल्या स्तरावर राबविण्यास हरकत नाही. ते कार्यक्रम राबवत असताना खालील मुद्द्यांचा विचार करावा. :

- कमी खर्चात अधिक व्यापक कार्यक्रम कसा राबविता येईल, यासाठी प्रयत्न करावा.
- उदाहरणार्थ, आपल्या शहरातील महाविद्यालये, सांस्कृतिक मंडळे, नाट्यशाळा, यांच्या एकत्रीकरणातून पथनाट्य स्पर्धा घेणे. या स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी केलेल्या पथनाट्यांना बक्षिसे देवून गौरव करावा व या पथनाट्यांचे शहरातील विविध ठिकाणी प्रदर्शन भरवावे. अशा प्रकारच्या कल्पक कार्यक्रमांमुळे लोकांचे आकर्षण मिळवून मोठ्या प्रमाणावर जनजागृती करता येऊ शकते.
- या कार्यक्रमात नावीन्यपूर्ण संकल्पना अंमलात आणण्यासाठी प्रयत्नशील असावे.
- हा कार्यक्रम अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचेल व आपल्याला अपेक्षित परिणामकारकता साधता येईल अश्या पद्धतीने कार्यक्रमाची अंमलबजावणी करावी.
- या सदरातील कार्यक्रम निवडताना परिशिष्ट २ मधील उपक्रमांची सूची उपयुक्त ठरू शकेल.












# आर्थिक शिस्त

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार माहिती, शिक्षण, संवाद आणि वर्तनातील बदल संबंधी उपक्रम राबवत असताना रचनात्मक आणि दीर्घकालीन स्वरूपात प्रभावी ठरतील, असे उपक्रम राबविणे आवश्यक आहे. ज्या उपक्रमांवर केंद्र शासन अथवा राज्य शासनामार्फत निधी खर्च केला जात आहे, त्यावर आपल्या स्थानिक स्वराज्य संस्थेने पुन्हा अधिक निधी खर्च करणे संयुक्तिक ठरणार नाही. तसेच, आपणास मिळणाऱ्या निधीपैकी ''लोकशिक्षण व जनजागृती'' / ''माहिती, शिक्षण, संवाद आणि वर्तमानातील बदल'' विषयासाठी ठरवून दिलेल्या राखीव निधीचा वापर केवळ त्याच विषयासाठी करावा. ते करत असताना आपणास हि मार्गदर्शक पुस्तिका सहाय्यक ठरेल. सदर उपक्रम राबवत असताना, निधी खर्च करत असताना खालील मुद्द्यांचा विचार करावा. :

✻ दूरचित्रवाणी व आकाशवाणी यांवर जनजागृतीचे कार्यक्रम प्रसारित करण्याचे काम केंद्र शासनातर्फे होत असल्या कारणाने आपणास प्राप्त निधीतून सदर कार्यक्रमांवर निधी अनावश्यक खर्च करू नये.

✻ या निधीचा विनियोग वाहन खरेदीसाठी करू नये.

✻ या निधीचा विनियोग बांधकाम विषयातील कोणत्याही कामासाठी करू नये.

✻ या निधीचा विनियोग इमारत देखभाल तसेच दुरुस्तीसाठी करू नये.

✻ या निधीचा विनियोग स्थानिक स्वराज्य संस्थेचे कर्मचारी यांची पगार देयके वितरीत करण्यासाठी करू नये.

✻ या निधीचा विनियोग कार्यालयीन तसेच इतर फर्निचर खरेदी, आदी यासाठी करू नये.



# परिशिष्ट १

## माहिती, शिक्षण, संवाद यासाठी प्रसिद्धीच्या संभाव्य माध्यमांची यादी

**अ) सार्वजनिक ठिकाणी प्रसिध्दीची ठिकाणे:**

१. सार्वजनिक ठिकाणचे अधिकृत होर्डींग्ज
२. विमानतळाचा प्रदर्शनी भाग/दिशादर्शक.
३. विमानतळावरील होर्डींग्ज
४. बसचे सीट कव्हर्सची मागील बाजू
५. बसचे बाहेरील पॅनल्स
६. बस स्थानकावरील शेड
७. रेल्वेचा मार्गदर्शक नकाशा
८. रेल्वेचे पादचारी पुल
९. मेट्रो स्थानकाचा दर्शनी भाग
१०.मेट्रो रेल्वेचे बाहेरील व आतील पॅनल्स
११. मेट्रो स्थानकातील छोटी दुकाने
१२. पेट्रोल पंप येथील होर्डींग्ज
१३. शहरातील दुकानांबाहेरील पॅनल
१४. पादचारी भुयारी मार्ग
१५. अधिकृत हातगाडी दुकाने
१६. परिवर्तन झालेली कचरा होणारी दुकाने.
१७. हिलीयम गॅसचे मोठे फुगे
१८. रस्ते वाहतूक सिग्नल खांब
१९ पथदीपक खांब
२०.सार्वजनिक पार्किंग स्थळे
२१.नप/मनपा जकात नाके

**ब) दृक–श्राव्य माध्यमे :**

१. शॉर्टफिल्म्स (लघूचित्रपट)
२. बस स्थानका वर वाजविली जाणारी ध्वनिफीत
३. रेल्वेस्थानकावर वाजविली जाणारी ध्वनिफीत
४.लोकल रेल्वेमध्ये वाजविली जाणारी ध्वनिफीत माध्यमातील जाहिरात.
५. घंटागाडीवर वाजविली जाणारी ध्वनिफीत
६. शहरातील जाहिरात करणारे एलसीडी स्क्रीन्स.

**क) जनसंज्ञापन (Mask Communication):**

१. अनेक जणांना एकावेळी ई–मेल करणे.
२. बल्क एसएमएस.
३. खुली प्रदर्शने
४. सिनेमागृहात दाखविल्या जाणा–या जाहिराती
५. इंटरनेट

**ड) वैयक्तिक माध्यमे :**

१. विमानसेवा बोर्डिंग पासेस
२. रेल्वे तिकीटे
३. वीजबिल/पाणी पट्टी/कर बिल
४. टेलिफोन बिल.
५. एलपीजी गॅस बिल
६. हॉटेल्सचे मेनुकार्ड
७. भारतीय रेल्वेचे पेपर कप

# परिशिष्ट २

## इनडोअर व आऊटडोअर उपक्रम

१. पत्रकारांकरिता अभ्यास दौरा
२. पत्रकार परिषदांचे आयोजन
३. पत्र लेखन स्पर्धेचे आयोजन
४. माहिती देणारे स्टॉल उभारणे
५. मॅरेथॉन/ दौड स्पर्धा अयोजित करणे
६. निबंध लेखन स्पर्धा
७. चित्र रंगविण्याची स्पर्धा
८. चित्रकला स्पर्धा
९. छाया चित्रण स्पर्धा
१०. छत्रीवरिल संदेश
११. रेनकोट / पावसाळी कोट वरिल संदेश
१२. एस.टी. बसस्थानकावरील भिंतीवर संदेश रंगविणे
१३. रांगोळी स्पर्धा
१४. बस स्थानकावरिल उदघोषणे दरम्यान जिंगल प्रसारण
१५. विद्युत पुरवठा खांबावर जाहिरात करणे
१६. एफ.एम. रेडीयोवर मुलाखत/चर्चा सत्र अयोजन
१७. नाटक/पथनाटय/विडंबन नाटय अयोजित करणे
१८. होर्डिंग
१९. शासकिय अधिकारी/कर्मचारी अभ्यास दौरा
२०. चित्रपटांच्या थेटर मधे जाहिराती
२१. शाळेत प्रदर्शन भरविणे
२२.शाळा–महाविदयालयातिल विदयार्थ्यांच्या प्रभात फेरी काढणे
२३. गृह भेट
२४. बस स्थानकावरिल टि.व्हि.स्क्रिन वर जाहिरात प्रसारित करणे
२५. रेल्वेच्या डब्यांवर जाहिरात करणे
२६. संपुर्ण एस.टि. बसवर आतुन व बाहेरून संदेश रंगविणे
२७. श्रमदान कार्यक्रमाचे आयोजन
२८. मोठया गॅस फुग्यांवर जाहिरात प्रकाशित करणे.
२९. ॲनिमेशिन/शॉर्ट फिल्म स्पर्धा
३०. छापील लेटर पॅड
३१. शालेय मुलांकरिता स्टिकर्स
३२. स्वच्छता कर्मचाऱ्यां करिता बक्षिस वितरण
३३. लघु संदेश
३४. सह्यादि्र वाहिनीवर मुलाखतीचे अयोजन
३५. महान्यूज या पोर्टलवर लेख प्रकाशित करणे
३६. खिशावर लावण्या करिता बॅच तयार / वितरित करणे
३७. मोबाईल रिंग टोन
३८. छापील मोबाईल कव्हर
३९. पत्राकरिता पाकिट
४०. व्हिजिटिंग कार्ड
४१. पेन
४२. यश कथा प्रसिध्द करणे
४३. लॅप टॅप कव्हर
४४. शाळा – महाविद्यालयातिल विद्यार्थ्यांकरिता बॅग तयार करणे

४५. वार्षिक दैनंदिनी तयार करणे
४६. वार्षिक दिनदर्शिका तयार करणे
४७. टेबलवर ठेवण्याकरिता दिनदर्शिका तयार करणे
४८. शाळा महाविद्यालयातिल विद्यार्थ्यां करिता नोटबुक तयार करणे
४९. कॉल सेंटरची स्थापना करणे
५०. स्वच्छतेचे संदेश देण्याकरिता कॉफी मग
५१. भिंती रंगविणे
५२. टि शट, टोप्या, साड्या यांच्यावर लोगो छापणे
५३. सापशिडी चा खेळ
५४. भिंतीवरिल घड्याळ
५५. सदिच्छा दुत नियुक्त करणे
५६. व्हिडीओ गेम तयार करणे
५७. विद्युत बिलावर जाहिरात प्रकाशित करणे